# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार - ब

वर्ष १, अंक ४१(४) ] मंगळवार, जून २३, २००९/आषाढ २, शके १९३१ [पृष्ठे १२

किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक ११७


**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ जून २००९

### अधिसूचना

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६.**

क्रमांक अशस. २००८/प्र. क्र. १८१/०८/नवि-२०.—महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ (२००७ चा महा. ३) याच्या कलम ४९ ची पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेली दिनांक १४ जानेवारी २००९ रोजी प्रसिद्ध झालेली शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग, क्रमांक अशस.२००८/प्र.क्र.१८१/०८/नवि-२०, दिनांक १३ जानेवारी २००९ द्वारे महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ (प्रारूप नियम) विहित केले आहेत. सदर नियमांबाबत उक्त अधिनियमांच्या कलम ४९(१) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे शासनास

प्राप्त झालेल्या हरकती/सूचना विचारात घेतल्यानंतर शासनास असलेल्या अधिकारात महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक नियम,२००९ हे खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांना, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम, २००९ असे म्हणावे.

(२) ते संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असतील.

(३) ते,—

(क) राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केलेल्या दिनांकास स्थानिक प्राधिकरणे आणि नियोजन प्राधिकरणे यांच्या क्षेत्रांमध्ये अंमलात येतील ;

(ख) राज्य शासन, त्याच किंवा तत्सम अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास इतर क्षेत्रांमध्ये किंवा क्षेत्रांच्या भागांमध्ये अंमलात येतील ; आणि त्यांच्या विभिन्न तरतुदींकरिता आणि निरनिराळ्या क्षेत्रांकरिता किंवा क्षेत्रांच्या भागांकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील ; आणि

(ग) या नियमातील एखाद्या तरतुदीच्या किंवा एखाद्या क्षेत्राच्या बाबतीत, या नियमांच्या प्रारंभासंबंधातील या नियमातील कोणत्याही संदर्भाचा अन्वयार्थ, त्या क्षेत्रात या नियमांच्या किंवा त्यांतील कोणत्याही तरतुदीच्या अंमलबजावणी संबंधातील संदर्भाप्रमाणेच लावण्यात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " अधिनियम " याचा अर्थ, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ असा आहे ;

(ख) " नमुना " याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना, असा आहे ;

(ग) " नियमित अग्निशमन सेवा " याचा अर्थ, राज्य शासन, स्थानिक प्राधिकरण किंवा नियोजन प्राधिकरणे यांच्याकडे, अग्निशमन प्रशासन, आग प्रतिबंध किंवा संरक्षण यांसाठी दिलेली सेवा, असा आहे ;

(घ) " कलम " याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे ;

(ड) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अधिनियमात जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. **नामनिर्देशित अधिकाऱ्याची नियुक्ती आणि अर्हता.**–(१) अधिनियमाच्या कलम २ च्या खंड ) अन्वये नियुक्ती करावयाचे नामनिर्देशित अधिकारी हे, प्रत्येक संबंधित महानगरपालिका, रपरिषद, नगरपंचायत, औद्योगिक नगरी किंवा नियोजन प्राधिकरण यांमधील, कलम २१ च्या पोट-नम (३) च्या खंड (क) आणि (ख) यांमध्ये नमूद केलेल्या अग्निशमन अधिकाऱ्यांमधून नियुक्त

करण्यात येतील ; आणि जेथे अद्याप अशा अग्निशमन अधिकाऱ्यांचा संवर्ग निर्माण केलेला नसेल तेथे, संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्याकडून अशा नामनिर्देशित अधिकारी, महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायत, औद्योगिक नगरी किंवा नियोजन प्राधिकरणे यांमधील, पुढील अर्हता धारण करणाऱ्या संवर्ग अग्निशमन अधिकाऱ्यांमधून किंवा अग्निशमन कर्मचाऱ्यांमधून नियुक्त करण्यात येतील :—

(क) "अ" आणि "ब" वर्ग महानगरपालिकांसाठी,—

(एक) ज्याने राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर, गृह मंत्रालय, भारत सरकार किंवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अग्निशमन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा प्रगत पदविका आणि आग प्रतिबंधक व संरक्षण कार्याची तपासणी आणि चाचणी यांबाबतच्या नियमित अग्निशमन सेवेतील किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल ; किंवा

(दोन) ज्याने भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था किंवा युनायटेड किंगडम अग्निशमन अभियांत्रिकी संस्था यांच्याकडील सदस्यत्व परीक्षा उत्तीर्ण केली असेल, आणि आग प्रतिबंध व संरक्षण कार्याबाबतच्या नियमित अग्निशमन सेवेतील किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल, असा अग्निशमन अधिकारी हा, नामनिर्देशित अधिकारी असेल ;

(ख) "क" आणि "ड" वर्ग महानगरपालिकांसाठी,—

(एक) ज्याने उपरोक्त राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर किंवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अग्निशमन अभियांत्रिकीमधील किमान पदविका, आणि नियमित अग्निशमन सेवेतील आग प्रतिबंधक व संरक्षण कार्याचा किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल ; किंवा

(दोन) ज्याने भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था किंवा युनायटेड किंगडम अग्निशमन अभियांत्रिकी संस्था यांच्याकडील श्रेणी (एक) ची परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; आणि आग प्रतिबंधक व संरक्षण कार्याची तपासणी आणि चाचणी यांबाबतच्या नियमित अग्निशमन सेवेतील किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल,

असा अग्निशमन अधिकारी हा, नामनिर्देशित अधिकारी असेल ;

(ग) नगरपरिषदा, नगरपंचायती किंवा औद्योगिक नगरी यांसाठी, ज्याने उपरोक्त राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर किंवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अग्निशमन अभियांत्रिकीमधील किमान पदविका, आणि नियमित अग्निशमन सेवेतील आग प्रतिबंधक व संरक्षण कार्याचा किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल असा, अग्निशमन अधिकारी हा, नामनिर्देशित अधिकारी असेल ;

(घ) विशेष नियोजन प्राधिकरणे आणि विशेष आर्थिक क्षेत्रे (एस.ई.झेड.) यांकरिता,

(एक) ज्याने राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर, गृह मंत्रालय, भारत सरकार किंवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अग्निशमन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा प्रगत पदविका आणि आग प्रतिबंधक व संरक्षण कार्याची तपासणी आणि चाचणी यांबाबतच्या नियमित अग्निशमन सेवेतील किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल ; किंवा

(दोन) ज्याने भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था किंवा युनायटेड किंगडम अग्निशमन अभियांत्रिकी संस्था यांच्याकडील सदस्यत्व परीक्षा उत्तीर्ण केली असेल, आणि आग प्रतिबंध व संरक्षण कार्याबाबतच्या नियमित अग्निशमन सेवेतील किमान दोन वर्षांचा अनुभव धारण केला असेल, असा अग्निशमन अधिकारी हा, नामनिर्देशित अधिकारी असेल.

(२) पोट-नियम (१) च्या व्याप्तीत न मोडणाऱ्या कोणत्याही क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये नामनिर्देशित अधिकाऱ्याची नियुक्ती, संबंधित इमारतींमधील किंवा प्रकल्पामधील संभाव्य आगीचा धोका विचारात घेता, पोटनियम (१) च्या खंड (क) किंवा (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण केली असेल अशा संचालकाच्या कार्यालयातील किंवा शेजारच्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणातील किंवा नियोजन प्राधिकरणातील अग्निशमन अधिकाऱ्यांमधून संचालकाकडून करण्यात येईल.

(३) पोट-नियम (१) च्या खंड (क), (ख), (ग) किंवा (घ) यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, पोट-नियम (१) च्या उक्त खंडाच्या व्याप्तीत येणाऱ्या क्षेत्रात किंवा त्या क्षेत्राबाहेर कोणताही विशेष, विशाल किंवा बृहत प्रकल्प येत असेल त्या बाबतीत इमारतींची पाहणी आणि तपासणी शेजारच्या महानगरपालिकेतील मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याकडून किंवा अर्हता प्राप्त नामनिर्देशित अधिकारी असल्यास त्याच्याकडून किंवा संचालक याबाबत कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(४) पोट-नियम (१), (२) आणि (३) यांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी, अग्निशमन अधिकाऱ्याने, त्याची नामनिर्देशित अधिकारी म्हणून नियुक्ती होण्यापूर्वी, राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन यांच्याकडील आग प्रतिबंध पाठ्यक्रम प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

४. **लायसन्सप्राप्त अभिकरणाकडून देण्यात यावयाची प्रमाणपत्रे.**—(१) अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे इमारतीतील किंवा त्याच्या भागातील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या अनुपालनासंबंधी लायसन्सप्राप्त अभिकरणाकडून देण्यात यावयाचे प्रमाणपत्र हे, " नमुना-अ " मध्ये असेल.

(२) अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्याप्रमाणे उत्तम व कार्यक्षम स्थितीत असलेल्या इमारती किंवा तिच्या जागेतील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या परीक्षणासंबंधी वर्षातून दोनदा, जानेवारी व जुलै महिन्यात लायसन्सप्राप्त अभिकरणाकडून द्यावयाचे प्रमाणपत्र हे " नमुना-ब " मध्ये असेल.

५. **आग लागण्यास कारणीभूत ठरण्याचा संभव असलेल्या वस्तू किंवा माल हलवण्याचा निर्देश देणारी नोटीस.**–(१) एखाद्या सुरक्षित ठिकाणाला आग लागण्यास कारणीभूत ठरण्याचा संभव असलेल्या वस्तू किंवा माल हलविण्याचा निर्देश देणारी, कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये इमारतीच्या किंवा जागेच्या मालकाला किंवा भोगवटादाराला द्यावयाची नोटीस " नमुना-क " मध्ये असेल.

(२) मालकाने किंवा भोगवटादाराने पोट-नियम (१) खाली दिलेल्या नोटिसीचे अनुपालन करण्यात कसूर केल्यावर, त्या वस्तू किंवा माल जप्त का करण्यात येऊ नये, अडकवून का ठेवण्यात येऊ नये किंवा हलविण्यात का येऊ नये याबाबत त्याला आपले म्हणणे मांडण्यासाठी कलम ४ च्या पोट-नियम (२) अन्वये आणखी एक नोटीस देण्यात येईल. अशी नोटीस " नमुना–ड " मध्ये असेल.

६. **जप्ती, इत्यादीचे ज्ञापन आणि पंचनामा.**–आग लागण्याचा धोका असलेल्या कोणत्याही वस्तू किंवा माल, कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये जप्त करणे, अडकवून ठेवणे किंवा हलविणे आवश्यक असेल त्याबाबतीत, तयार करावयाचे जप्ती, इत्यादीचे ज्ञापन " नमुना-ई " मध्ये असेल, आणि त्याबाबतीत करावयाचा पंचनामा " नमुना-फ " मध्ये असेल.

७. **प्रवेश व तपासणी याकरिता द्यावयाची नोटीस.**–(१) कोणत्याही जागेतील किंवा इमारतीतील किंवा त्याच्या भागातील आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनेच्या पर्याप्ततेची किंवा त्यांच्या उल्लंघनाची खात्री करून घेण्यासाठी कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये द्यावयाची प्रवेश आणि तपासणी याबद्दलची आवश्यक ती नोटीस, " नमुना-ग " मध्ये असेल.

(२) जी, प्रथेनुसार लोकांसमोर येत नाही अशा स्त्रीला कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये द्यावयाची आवश्यक ती नोटीस " नमुना-ह " मध्ये असेल.

८. **नामनिर्देशित अधिकाऱ्याच्या तपासणीचा अहवाल.**–कलम ५ अन्वये नामनिर्देशित अधिकाऱ्याने तपासणी केली असेल त्याबाबतीत तो, अशा तपासणीचा अहवाल " नमुना-आय " मध्ये देईल.

९. **विवक्षित उपाययोजना हाती घेण्यासाठी इमारतीच्या किंवा त्याच्या भागाच्या मालकाला किंवा भोगवटादाराला द्यावयाची नोटीस.**—(१) जागेची किंवा इमारतीची किंवा त्याच्या भागाची तपासणी पूर्ण झाल्यावर, आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या संबंधातील कोणतेही विचलन, किंवा आवश्यक्तांचे उल्लंघन, अथवा इमारतीच्या उंचीच्या संदर्भात किंवा अशा जागेमध्ये किंवा इमारतीमध्ये

किंवा तिच्या भागामध्ये केल्या जाणाऱ्या कामांच्या स्वरूपासंदर्भात, त्याठिकाणी पुरविण्यात आलेल्या किंवा पुरवावयाच्या अशा संरक्षक उपाययोजनांची अपर्याप्तता किंवा त्या उपाययोजनांचे अनुपालन न झाल्याचे निदर्शनास येईल त्याबाबतीत, अशा जागेच्या किंवा इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या मालकास किंवा भोगवटादारास, अधिनियमाच्या कलम ६ अन्वये ७ दिवसांच्या आत आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याबाबत त्यांना निर्देश देणारी नोटीस "नमुना-जे" मध्ये देण्यात देईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये मालकाला किंवा भोगवटादाराला देण्यात येणाऱ्या नोटिसीमध्ये विनिर्दिष्ट करावयाची मुदत, हाती घ्यावयाच्या उपाययोजनांचे स्वरूप लक्षात घेऊन विनिर्दिष्ट करण्यात येईल परंतु, अशी मुदत १२० दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

१०. **जागा किंवा इमारत किंवा तिचा भाग सीलबंद करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती.**—संचालक किंवा मुख्य अग्निशमन अधिकारी, कलम-८ च्या पोट-कलम (३) अन्वये सीलबंद करण्याची आवश्यकता असलेली कोणतीही जागा किंवा इमारत किंवा तिचा कोणताही भाग या संबंधात पुढील कार्यपद्धती अनुसरली जाईल :—

(क) तो, सीलबंद करावयाची जागा किंवा इमारत किंवा तिचा भाग ज्यांच्या ताब्यात किंवा भोगवट्यात असेल अशा व्यक्तींना ताबडतोब तेथून निघून जाण्याचा आदेश देईल ;

(ख) उक्त आदेशाचे पालन न केल्यास, तो त्या क्षेत्रात अधिकारिता असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला, अशा व्यक्तींना त्या जागेतून किंवा इमारतीतून किंवा तिच्या भागातून हलविण्याचे निदेश देईल ;

(ग) ज्यांच्या ताब्यात किंवा भोगवट्यात अशी जागा किंवा इमारत किंवा तिचा भाग असेल अशा व्यक्तींना तेथून हलविल्यानंतर, तो त्यास योग्य वाटेल अशा रितीने, त्या पोलीस अधिकाऱ्याकडून अशी जागा किंवा इमारत किंवा त्याचा भाग सीलबंद करण्याची व्यवस्था करील ;

(घ) पूर्वोक्तप्रमाणे सीलबंद करण्यासाठी वापरण्यात येणारी मोहोर ही, संचालकाच्या किंवा, यथास्थिति, मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याच्या/अभिरक्षेत राहील ;

(ड) (एक) नामनिर्देशित अधिकाऱ्याचा अहवाल मिळाल्यावर सीलबंद करण्याची आवश्यकता असलेल्या जागेला किंवा इमारतीला किंवा तिच्या भागाला कुलूप लावले असल्याचे किंवा त्यात प्रवेश करणे दुर्लभ असल्याचे आढळून येईल तेव्हा त्यास, पोलीस अधिकाऱ्याकडून ते कुलूप तोडता येईल व त्यात प्रवेश करता येईल, आणि अधिनियमाखाली किंवा नियमांखाली करावयाच्या आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्यानंतर, त्या जागेला किंवा इमारतीला किंवा तिच्या भागाला पुन्हा कुलूप लावता येईल आणि पूर्वोक्तप्रमाणे सीलबंद करण्याची व्यवस्था करता येईल ;

(दोन) पोट-खंड (एक) अन्वये एखाद्या जागेस किंवा इमारतीस किंवा तिच्या भागास सीलबंद केलेले असेल त्या बाबतीत, अशा जागेत किंवा इमारतीत किंवा तिच्या भागात आढळून आलेल्या वस्तुंची सूची, दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या उपस्थितीत तयार करण्यात येईल आणि तिची एक प्रत, त्या जागेत उपस्थित असल्यास, मालकाला किंवा भोगवटादाराला देण्यात येईल. अशा सूचीसाठी आणि त्याबाबत तयार करावयाच्या पंचनाम्यासाठी अनुक्रमे " नमुना-ई आणि फ " योग्य त्या फेरफारांसह वापरण्यात येईल ;

(च) कोणत्याही जागेस किंवा इमारतीत किंवा तिच्या भागास अशी लावलेली मोहोर तोडल्याचे किंवा त्यामध्ये फिरवाफिरव केल्याचे आढळून येईल तेव्हा, तो, संबंधित पोलीस ठाण्याला लेखी कळवील.

११. **निकटवर्ती धोका असलेल्या एखाद्या जागेच्या किंवा इमारतीच्या किंवा त्याच्या भागाच्या विद्युत किंवा पाणीपुरवठ्यास जबाबदार असलेल्या प्राधिकाऱ्यांना असा पुरवठा खंडित करण्याचे, किंवा अशा जागेतील किंवा इमारतीतील किंवा तिच्या भागातील व्यक्तींना हलविण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याला आदेश देणे.**—(१) कोणत्याही व्यक्तीस किंवा मालमत्तेस धोकादायक असलेल्या जागेला किंवा इमारतीला किंवा तिच्या भागाला होणाऱ्या विद्युत किंवा, यथास्थिति, पाणीपुरवठ्यासाठी जबाबदार असलेल्या प्राधिकाऱ्यास असा विद्युत किंवा, यथास्थिति, पाणीपुरवठा खंडित करण्याबाबत निर्देश देणारा, कलम ८ चे पोट-कलम (२) च्या खंड (क) खालील आदेश हा, " नमुना-के " मध्ये असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस किंवा मालमत्तेस धोकादायक असलेल्या कोणत्याही जागेतील किंवा इमारतीतील किंवा तिच्या भागातील व्यक्तींना हलविण्यासाठी त्या क्षेत्रात अधिकारिता असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास निर्देश देणारा, कलम ८ चे पोट-कलम (२) च्या खंड (ख) खालील आदेश हा, " नमुना-ल " मध्ये असेल.

१२. **लायसेन्स अभिकरण म्हणून कार्य करण्यासाठी पात्रता.**—लायसेन्स अभिकरण म्हणून काम करण्यासाठी खालील नियमात विहीत केलेली पात्रता धारण करीत असल्याशिवाय कोणतीही व्यक्ती अर्ज करू शकणार नाही आणि असे लायसन्स मिळविण्यासाठी,—

(१) कोणतीही व्यक्ती, या नियमाच्या पोट-नियम (१) च्या खंड (क) मध्ये नमूद केलेली कोणतीही किमान अर्हता धारण करील.

(अ) (एक) भारत सरकार, गृह मंत्रालय यांच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर, या महाविद्यालयाची अग्निशमन अभियांत्रिकीतील पदवी किंवा प्रगत पदविका किंवा पदविका ; किंवा

(दोन) अग्निशमन अभियांत्रिकीतील फेलो ऑफ इन्स्टिट्यूशन ऑफ फायर इंजिनिअरींग (यू.के.) किंवा एम.आय. फायर (यू.के.) किंवा ए.एम.आय.ई., फायर इंडिया, इन्स्टिट्यूशन ऑफ फायर इंजिनिअरींग (यू.के. किंवा इंडिया) ग्रॅज्युएटशिप परिक्षा.

(ब) (एक) मान्यताप्राप्त विद्यापीठाची यांत्रिकी किंवा विद्युत किंवा इलेक्ट्रॉनिक किंवा स्थापत्य अभियांत्रिकी किंवा रासायनिक अभियांत्रिकी किंवा संगणक उपाययोजना यामधील पदवी किंवा पदविका धारण करीत असेल तर ; आणि

(दोन) वेळोवेळी सुधारणा केलेल्या राष्ट्रीय इमारत संहिता, २००५ किंवा राष्ट्रीय अग्निशमन संरक्षण संघ, २००८ यांनी प्रकाशित केलेल्या संहिता यामध्ये निर्धारित केल्याप्रमाणे आग प्रतिबंधक व अग्निशमन संरक्षण करणाऱ्या यंत्रणेमधील अनुभव धारण करीत असेल तर ; किंवा

वरील (ब) बाबत त्या इमारतीच्या किंवा प्रकल्पाच्या अग्निशमन संरक्षण व जीवसंरक्षण उपाययोजनासंबंधीचे काम पार पाडण्याच्या व त्या कामाचे पर्यवेक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ नोकरीत, जेथे आगीपासून संरक्षण, आग प्रतिबंधक व संरक्षक उपाययोजनांच्या संबंधातील अग्निशमन अभियांत्रिकीमधील पदवी किंवा पदविका किंवा इतर कोणतीही अर्हता आवश्यक असेल तेथे खंड (क) मध्ये **विनिर्दिष्ट** केलेली कोणतीही अर्हता धारण करणारा अधिकारी किंवा पर्यवेक्षक अधिकारी असेल तर ;

(२) शासनाच्या पूर्वमान्यतेने संचालकाने विनिर्दिष्ट केलेली असेल अशा रकमेचे पतदारी प्रमाणपत्र धारण करीत असेल तर ;

(३) अर्ज करण्याच्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या तीन वर्षांच्या कालावधीत, आग प्रतिबंध व अग्निशमन यंत्रणेत काम केले नसेल तर किंवा राज्य अग्निशमन अकादमी, महाराष्ट्र शासन यांनी दिलेले अग्निशमन विशेषज्ञता प्रमाणपत्र धारण करीत असेल तर ;

(४) आग प्रतिबंधक व अग्निशमन यंत्रणेशीसंबंधीत असलेली पुरेशी यंत्रसामग्री, हत्यारे, इतर आवश्यक ती उपकरणे, असतील तर ; आणि

(५) तिला कोणत्याही शासकीय विभागाने किंवा संघटनेने किंवा इतर कोणत्याही राज्याने काळ्या यादीत टाकलेले नसेल तर ती, लायसेन्सप्राप्त अभिकरण म्हणून कार्य करण्याबाबतचे लायसेन्स देण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असेल ; आणि तसेच, लायसेन्सप्राप्त अभिकरण म्हणून कार्य करण्यासाठी तिला लायसेन्स देण्यात येणार नाही.

१३. लायसन्सप्राप्त अभिकरणासाठी करावयाचा अर्ज, तो करण्याची पद्धत आणि त्यासंबंधातील फी.—(१) अधिनियमाच्या कलम ९ च्या प्रयोजनार्थ, लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून कार्य करण्यासाठीच्या लायसन्सकरिता करण्यात येणारा प्रत्येक अर्ज हा "नमुना-म" मध्ये असेल.

(२) असा अर्ज, व्यक्तीशः सादर करण्यात येईल किंवा नोंदणीकृत डाकेने किंवा कुरीयर एजन्सीद्वारा किंवा ऑनलाईन पाठविण्यात येईल.

(३) अशा प्रत्येक अर्जासोबत पुढील बाबी जोडलेल्या असतील,—

(क) खाली नमूद केलेली फी :—

| स्थानिक प्राधिकरणे किंवा नियोजन प्राधिकरणे यांचा वर्ग | किमान पतदारी प्रमाणपत्रासाठी मर्यादा (रु. लाखांत) | खर्चाच्या अदांजपत्रकानुसार काम करावयासाठी विहित मर्यादा (रु. लाखांत) | मागील ३ वर्षांत केलेल्या किमान कामाचा वार्षिक खर्च (रु. लाखांत) | | | नोंदणी शुल्क (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अग्निशमन यंत्रणा बसवल्याचा तपशील जसे हायड्रंट, स्प्रिंकलर्स, पंपिंग इत्यादी | आग निरोध आणि विभक्तीकरण व्यवस्था | स्थायी संरक्षण जसे केबल संरक्षक, अग्निशमन दरवाजे इत्यादी | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| अ | १५०.०० | अमर्यादित | ५००.०० | २००.०० | २००.०० | २५००० |
| ब | १०.०० | १०००.०० | ३००.०० | १००.०० | १००.०० | १५००० |
| क | ०५.०० | ६००.०० | २००.०० | ५०.०० | ५०.०० | ५००० |
| ड | ०२.५० | ३००.०० | १००.०० | २५.०० | २५.०० | २५०० |

(ख) संचालकाने विनिर्दिष्ट केलेली असतील अशी पुढील कागदपत्रे :—

(१) नियम १२ च्या पोटनियम (२) अन्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे योग्य त्या रकमेची पतदारी प्रमाणपत्र ;

(२) भागीदारी विलेखाची साक्षांकित प्रत आणि मुखत्यारनामा किंवा संस्थापन किंवा समयलेख किंवा एखादी व्यक्ती, व्यवसाय संस्थेची एकमेव मालक असेल त्याबाबतीत मुद्रांक कागदावरील शपथपत्र ;

(३) कामे समाधानपूर्वक पूर्ण केल्याबाबतची संबंधित विभागाकडील मागील तीन वर्षांची प्रमाणपत्रे ;

(४) (त्या वर्गासाठीच्या विहीत रकमेपर्यंतच्या) चालू वर्षात हातात असलेल्या कामांच्या मागण्या ;

(५) खासगी कामांच्या बाबतीत विहित नमुन्यातील सनदी लेखापाल किंवा नोंदणीकृत आयकर व्यवसायी यांच्याकडून मिळालेले प्रमाणपत्र ;

(६) एखाद्या विशिष्ट वर्गासाठीच्या नोंदणीकरिता प्रथमच अर्ज केला असेल तर अर्ज केलेल्या त्या विशिष्ट वर्गाखालील वर्गात येणाऱ्या, त्या वर्गातील जास्तीतजास्त रकमे पर्यंतचे किमान एकतरी काम केलेले असावे ;

(७) नियम १२, पोटनियम (१), खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही अर्हता धारण करत असलेल्या किमान एका अधिकाऱ्याच्या नियुक्तीसंबंधीचे प्रमाणपत्र ;

(८) भागीदार किंवा संचालक किंवा मालक आणि बाब (८) मध्ये निर्देशिलेला अधिकारी किंवा निर्देशिलेले अधिकारी यांचेदेखील पासपोर्ट आकाराचे साक्षांकित छायाचित्र ;

(९) मूल्यवर्धित कर (व्हॅट) नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत ;

(१०) शासन किंवा निमशासकीय संस्था यांच्याकडे त्याच्या किंवा तिच्या भागीदारी संस्थेची यापूर्वी काळ्या यादीत नोंदणी करण्यात आलेली नाही हे नमूद करणारे समुचित मुद्रांक कागदावरील प्रतिज्ञापत्र ;

(११) त्यांच्या अर्हतेसह तांत्रिक कर्मचाऱ्यांची यादी.

१४. **लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्यासाठीचे लायसन्स.**— लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्यासाठी " नमुना-न " मध्ये लायसन्स देण्यात येईल आणि ते पुढील शर्तींच्या अधीन असेल :—

(१) लायसन्स,—

(क) अहस्तांतरणीय असेल ;

(ख) अगोदरच लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात आले नसेल तर लायसन्स देण्यात आल्यापासून एक वर्षापर्यंत वैध असेल ;

(ग) लायसन्स समाप्त होण्यापूर्वी, तशी इच्छा असल्यास, नविकरण योग्य असेल ;

(२) (क) भागीदार, संचालक किंवा सदस्य ;

(ख) लायसन्सप्राप्त अभिकरणाच्या कार्यालयाचा पत्ता.

यांबाबतीत कोणतेही बदल करावयाचे असल्यास, लायसन्स देणाऱ्या प्राधिकरणाला तात्काळ कळविण्यात येईल.

(३) लायसन्सप्राप्त अभिकरण नेहमी ते करीत असलेले किंवा त्याने केलेले काम, संचालक, मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा संचालक किंवा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी प्राधिकृत केलेला कोणताही अग्निशमन अधिकारी यांना तपासणीसाठी खुले ठेवील.

१५. **लायसन्सचे नूतनीकरण.**— कलम ९ आणि नियम १४ खाली देण्यात आलेल्या एखाद्या लायसन्सच्या नूतनीकरण करणासाठीचा अर्ज, " नमुना-म " मध्ये देखील करता येईल आणि त्यासोबत नियम १३, पोटनियम (३), खंड (क) खाली विनिर्दिष्ट केलेली फी आणि नियम १३, पोटनियम (३), खंड (ख) खाली नमूद केलेली कागदपत्रेदेखील जोडण्यात येतील.

१६. **लायसन्सप्राप्त अभिकरणाने धारण केलेल्या लायसन्समध्ये भर घालणे.**— (१) कलम ९ आणि नियम १४ खाली देण्यात आलेले किंवा नूतनीकरण करण्यात आलेले कोणत्याही वर्गासाठी किंवा वर्णनाचे देण्यात आलेले लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्यासाठीचे लायसन्स धारण करणाऱ्या व्यक्तीला व जी अन्य कोणत्याही वर्गासाठी किंवा वर्णनाचे लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्यास पात्र आहे अशा व्यक्तीला देखील अशा अन्य वर्गाची किंवा वर्णनाची भर घालण्यासाठी "नमुना म" मध्ये अर्ज करता येईल.

(२) जर उक्त अर्ज हा कलम ९ आणि नियम १४ अनुसार अर्जदाराला त्याच्या लायसन्समध्ये जो वर्ग किंवा जे वर्णन जादा दाखल करून घ्यावयाची इच्छा आहे असे लायसन्स देण्याकरिता असेल तर नियम १३ च्या तरतुदी ह्या पोटनियम (१) खालील करण्यात आलेल्या अर्जाला लागू होतील.

१७. **लायसन्स निलंबित किंवा रद्द करण्यात का येऊ नये यासाठीची कारणे दाखवा नोटीस.**— ज्यांना लायसन्स देण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा नियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे किंवा लायसन्सच्या शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे किंवा अक्षमता, गैरवर्तवणूक किंवा अन्य कोणत्याही गंभीर कारणावरून ती अपात्र ठरली असेल तर, लायसन्सप्राप्त अभिकरण म्हणून काम करण्यासाठी तिला देण्यात आलेले लायसन्स निलंबित किंवा रद्द का करण्यात येऊ नये यासाठी अशा व्यक्तीला "नमुना ओ" मध्ये कारणे दाखवा नोटीस देता येईल.

१८. **अग्निशमन सेवा फी च्या निर्धारणासाठी अर्ज करणे.**— (१) ज्यांच्या इमारतीचे बांधकाम करण्याचा उद्देश आहे किंवा ज्याने अशा इमारतीच्या बांधकामास पोटकलम (१) मध्ये करण्यात

आलेल्या तरतुदीप्रमाणे सुरुवात केली आहे अशा व्यक्तीकडून देय असलेल्या अग्निशमन सेवा फी च्या रकमेच्या निर्धारणाकरिता कलम १४ च्या पोटकलम (१) खालील करावयाचा अर्ज अशी व्यक्ती "नमुना प" मध्ये प्राधिकरणाकडे अर्ज देऊ करील.

(२) एखाद्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठीची परवानगी घेण्यासाठी व कोणत्याही परिस्थितीत प्राधिकरणाकडून अशी परवानगी देण्यात येण्यापूर्वी अर्ज करताना असा अर्ज करण्यात येईल, आणि प्राधिकरणाच्या परवानगीसाठी असा अर्ज न करता जी व्यक्ती इमारतीच्या बांधकामास सुरुवात करील ती, अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत अशा इमारतीच्या बाबतीत देय असलेल्या फीच्या रकमेचे निर्धारण करण्याविषयीचा अर्ज करील.

(३) असा अर्ज व्यक्तीशः किंवा नोंदणी डाकेने किंवा कुरियर एजन्सीमार्फत किंवा ऑनलाईन सादर करता येईल.

१९. **सुनावणीची नोटीस.**— प्राधिकरण ज्या व्यक्तीने कलम १४, पोटकलम (१) खाली अर्ज केला असेल किंवा ज्या व्यक्तीने परवानगी न घेता इमारतीचे बांधकाम केले असेल तिला इमारतीचे बांधकाम करण्याचा जिचा उद्देश आहे किंवा जिने परवानगी न घेता, इमारतीचे बांधकाम केले आहे, अशा प्रकरणी वसुलीयोग्य अग्निशमन सेवा फी च्या निर्धारणाच्या बाबतीत "नमुना क्यु" मध्ये नोटीस देईल, आणि कलम १४, पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी आणि पुढील मार्गदर्शक तत्त्वेदेखील विचारात घेऊन अशा व्यक्तीकडून वसुली योग्य असलेली व तिच्याकडून देय असलेली फी निर्धारीत करील.

**मार्गदर्शक तत्त्वे.—**

(१) (एक) निवासी इमारती,—

(क) निवासिगृहे किंवा फिरतेगृहे,

(ख) एक किंवा दोन कुटुंबांसाठी खाजगी राहती घरे, शयनगृहे, वेश्मिका घरे,

(ग) हॉटेल,

(घ) तारांकित हॉटेल.

(दोन) शैक्षणिक इमारती.

(तीन) संस्था इमारती,—

(क) रुग्णालये, आरोग्यधाम व सुश्रुषागृहे,

(ख) अभिरक्षार्थ, शिक्षार्थ व प्लेंटल (कारखाने).

(चार) विधिसभागृहाच्या इमारती (सभागृहाच्या इमारती).

(पाच) व्यावसायिक इमारती

(सहा) वाणिज्यिक इमारती,—

(क) एफ-१ व एफ-२ इमारती

(ख) भुयारी व्यापारी संकुले.

यांच्याबाबतीत,—

(एक) जर एखाद्या इमारतीमध्ये तिच्या लगतच्या आणि बांधकामाचा भाग असलेल्या निरनिराळ्या पाखांचा (विंग्ज) किंवा विस्तारगृहाचा समावेश असेल तर मुख्य इमारतीचे पाख (विंग्ज) व विस्तारगृहे यांचे एकूण क्षेत्र मिळून एक इमारत असल्याचे परिगणित करण्यात येईल.

(दोन) विद्यमान इमारतींमध्ये कोणतीही भर घालण्यात आली असेल तर ते इमारतीचे संपूर्ण क्षेत्र असल्याचे परिगणित करण्यात येईल आणि त्याबाबतची वसुलीयोग्य व देय अग्निशमन सेवा फी ची परिगणना ही अशा संपूर्ण क्षेत्रासाठीची अग्निशमन सेवा फी, वजा यापूर्वी भरलेली फी मग ती कितीही असल्यास तितकी फी अशी करण्यात येईल.

(तीन) एखाद्या इमारतीच्या अंतर्भागाची रचना, ज्यात ज्या माळ्याचे किंवा पोटमाळ्याचे बांधकाम करून यात समावेश करण्यात आला आहे अशा अंतर्गत फेरफार करून स्थूल बांधीव क्षेत्रामध्ये कोणतीही भर घातल्याशिवाय बदलण्यात आली असेल तर, त्यासाठी कोणतीही अग्निशमन सेवा फी वसूल केली जाणार नाही.

(२) (एक) औद्योगिक इमारती—

(क) कमी धोका असलेल्या इमारती,

(ख) मध्यम धोका असलेल्या इमारती,

(ग) अतिधोका असलेल्या इमारती.

(दोन) कोठाराच्या (साठवणीच्या) इमारती.

(तीन) धोकादायक इमारती,—

(एक) जेव्हा एखाद्या इमारतीचा भोगवटा मिश्र स्वरुपाचा असेल तेव्हा प्रत्येक भोगवट्याचे स्वरुप लक्षात घेऊन त्याप्रमाणे अग्निशमन सेवा फी बसविण्यात येईल.

(दोन) एखादी इमारत कप्पाबंद असल्यास, जे कप्पे (खोल्या) नव्याने बांधण्यात आले आहेत किंवा विद्यमान कप्प्यांमध्ये (खोल्यांमध्ये) कोणतीही भर घालण्यात आली असेल किंवा त्यात कोणतेही फेरफार करण्यात आले असतील तर अशा नवीन किंवा नव्याने भर घातलेल्या कप्प्यांवर (खोल्यांवर) असा कप्पा (खोली) त्याच इमारतीचा सलग भाग किंवा इमारतीच्या अंतरचनेतून तयार झालेला भाग असला तरी त्यावर अग्निशमन सेवा फी बसविण्यात येईल.

(तीन) एखाद्या इमारतीच्या अंतर्भागाची रचना, ज्यात ज्या माळ्याचे किंवा पोटमजल्याचे बांधकाम करून यात समावेश करण्यात आला आहे, असा अंतर्गत फेरफार करून स्थूल बांधीव क्षेत्रामध्ये कोणतीही भर घातल्याशिवाय बदलण्यात आली असेल तर त्यासाठी अग्निशमन सेवा फी बसविण्यात येईल.

२०. **अग्निशमन सेवा फी च्या निर्धारणाची नोटीस देणे व तिची वसुली करणे.**— (१) नियम १९ खाली फी चे निर्धारण करण्यात आल्यानंतर, अशा निर्धारणाविषयीची "नमुना र" मधील नोटीस अर्जदारावर किंवा संबंधित व्यक्तिवर बजावण्यात येईल.

(२) नियम १९ व या नियमाचा पोटनियम (१) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारासह ज्या इमारतीचे बांधकाम हे हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिवशी किंवा तो अंमलात येण्याच्या दिनांकानंतर पूर्ण झाले असेल अशा इमारतींच्या बाबतीत अग्निशमन सेवा फी च्या निर्धारणाकरिता लागू होतील.

(३) अधिनियमात किंवा या नियमांतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी वगळता, प्राधिकरणाने याला लागू असलेल्या कोणताही संबंद्ध कायदा किंवा संलेख याखाली बसविलेल्या कर किंवा फी वसूल करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यवाही ही या नियमांखाली निर्धारित करण्यात आलेली अग्निशमन सेवा फी वसूल करण्यास देखील लागू होईल.

२१. **कलम १८ अन्वये अग्निशमन सेवा संचालक नियुक्त करणे.**— या नियमांना बाधा न येता कोणतेही असल्यास त्या त्या काळी अंमलात असलेल्या संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा (गट 'अ') या पदावरील सेवा प्रवेशाचे विनियम करण्यासाठी कलम १८ द्वारे नियुक्त करावयाचा अग्निशमन संचालक हा, नेहमीच शैक्षणिक अर्हता व अग्निशमन सेवेतील प्रत्यक्ष अनुभव धारण करणारी व्यक्ती असेल.

२२. **अग्निशमन अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची कर्तव्ये व दायित्वे.**— (१) पोटनियम (२) च्या तरतुदीच्या अधीनतेने, अग्निशमन अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची कर्तव्ये व दायित्वे ही राज्य शासनाकडून तयार करण्यात येणाऱ्या अग्निशमन सेवा नियम पुस्तिका यांत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील.

(२) संचालकास शासनाच्या मान्यतेने अग्निशमन अधिकारी व कर्मचारी वर्ग यांच्या कर्तव्य व दायित्वांमध्ये सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे भर घालता येईल, ती वगळता येतील किंवा त्यात फेरफार करता येईल आणि त्यानंतर तद्नुसार अग्निशमन सेवा नियम पुस्तिकेत सुधारणा झाल्याचे समजण्यात येईल.

२३. **अग्निशामक साधनसामग्री मागणी आदेश.**— अग्निशामक साधनसामग्री किंवा कोणत्याही प्राधिकरणाची किंवा कोणत्याही संस्थेची किंवा व्यक्तीची मालमत्ता याबाबतचा मागणी आदेश कलम २६, पोट-कलम (१) खाली काढण्यात आलेला मागणी आदेश "नमुना स" मध्ये काढण्यात येईल.

२४. अग्निशमनाचे कार्य करतेवेळी झालेल्या जागेच्या नुकसानाबाबतचा अहवाल देणे व **नुकसानभरपाईच्या रकमेचे निर्धारण करणे व ती प्रदान करणे.**— (१) संचालक किंवा मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा जो घटनास्थळी करण्यात आलेल्या अग्निशमन कार्याचा प्रभारी असेल असा अन्य कोणताही अग्निशमन अधिकारी अग्निशमनाचे कार्य करताना आणि कलम २७, पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेले बचाव कार्य करताना, अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कर्मचारी यांच्याकडून जागेचे कोणतेही नुकसान झाल्यास त्याविषयीचा "नमुना ट" मधील अहवाल प्राधिकरणाला देईल.

(२) पोट-नियम (१) खालील अहवाल मिळाल्यावर कोणत्याही जागेच्या किंवा अन्य कोणत्याही मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीचे निर्धारण प्राधिकरणाच्या अधिकाऱ्याकडून करण्यात येईल याबाबतीत प्राधिकरणाला अधिकारी पद निर्देशित करता येईल आणि असा पदनिर्देशित अधिकारी निर्धारण करण्यात झालेल्या, नुकसान झालेल्या संबंधित मालमत्तेच्या मालकाला किंवा भोगवटादाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यावर, त्याबाबतच्या त्याच्या शिफारशी निर्णयार्थ प्राधिकरणाकडे पाठवील.

(३) अशा पदनिर्देशित अधिकाऱ्याने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन व ज्या इमारतींचे किंवा मालमत्तेचे असे नुकसान झाले असेल तिचा त्यावेळी विमा उतरविण्यात आला असेल तर, विमा कंपनी मालकास किंवा भोगवटादारास प्रदान करावयाची नुकसानभरपाईची रक्कम निश्चित करताना व मंजूर करताना, अग्निशमनाचे काम व बचाव कार्य करतेवेळी अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कर्मचारी यांच्याकडून जागेचे किंवा अन्य कोणत्याही मालमत्तेचे झालेले नुकसान ध्यानात घेतले जाईल.

२५. **आग दुर्घटनेदरम्यानच्या कालावधीत अग्निशमन अधिकाऱ्याला किंवा अग्निशमन कर्मचाऱ्याला झालेल्या अपघाताचा अहवाल.**— अग्निशमन किंवा नैसर्गिक आपत्ती कार्याचा प्रभारी अधिकारी, अशा कार्यादरम्यानच्या कालावधीत घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेचा अहवाल संचालक आणि तसेच मुख्य अग्निशमन अधिकारी यांना सादर करील आणि अशा दुर्घटनेच्या बाबतीत कोणत्याही अग्निशमन अधिकाऱ्याला किंवा अग्निशमन कर्मचाऱ्याला किंवा त्यांचा मृत्यु झाल्यास अथवा ते कायमस्वरुपी विकलांग झाल्यास त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना देय असलेली नुकसानभरपाई ही संचालक राज्य शासनाच्या मान्यतेने कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करील अशी असेल.

२६. **अग्निशमन अधिकाऱ्याविरुद्ध किंवा अग्निशमन कर्मचाऱ्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करणे.**— जो अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कर्मचारी त्याच्या कर्तव्यांचा भंग करील किंवा अधिनियमाच्या किंवा नियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील किंवा कोणताही भ्याडपणा प्रदर्शित करील किंवा अशा भ्याडपणाला वाव देईल किंवा परवानगीशिवाय आपल्या पदाच्या कर्तव्यापासून परावृत्त होईल किंवा रजेनिमित्त अनुपस्थित राहून अशी रजा संपल्यावर, वाजवी कारणाशिवाय कामावर हजर होण्यात कसूर

करील, किंवा प्राधिकाराशिवाय त्याच्या नोकरीखेरीज इतर कोणतीही नोकरी करील तर, असा अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कर्मचारी त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास पात्र असेल आणि तसेच, तो या नियमाच्या उल्लंघनाबद्दलच्या कारवाईसह अशा शिस्तभंगाच्या कारवाईसदेखील पात्र असेल.

२७. **अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कर्मचारी यांच्या कर्तव्य क्षेत्रात किंवा क्षेत्राबाहेर अग्निशमनाचे कार्य वगळता इतर प्रयोजनासाठी त्यांना कामावर लावणे.**— अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कर्मचारी यांना नैसर्गिक आपत्ती आणि जीव बचावाशी संबंधित सर्व हक्कांच्या प्रकरणी संचालकाच्या किंवा मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याच्या किंवा संचालकाने किंवा मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याच्या स्वेच्छानिर्णयाने अग्निशमनाचे कार्य वगळता इतर प्रयोजनांसाठी कामावर लावण्यात येईल.

२८. **अग्निशमन कार्यासाठी आवश्यक असलेल्या पाणीपुरवठ्याचे दर.**— अग्निशमन कार्याचा प्रभारी अधिकारी त्या क्षेत्रातील कोणत्याही स्त्रोतातून, अशा कार्यासाठी त्यास आवश्यक वाटेल इतके पाणी घेईल त्याबाबतीत, अशा पाण्याच्या स्त्रोतावर नियंत्रण असलेल्या प्राधिकाऱ्यास किंवा मालकास किंवा भोगवटादारास अशा वापरलेल्या पाण्याबद्दल,—

(क) प्राधिकाऱ्याकडून पाणी घेतले असेल तेव्हा अशा प्राधिकाऱ्याने अशा क्षेत्रातील पाणी वापरदारांवर नेहमी आकारल्या जाणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या निम्न दराने पैसे देण्यात येतील,

(ख) कोणत्याही मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून पाणी घेतले असेल तेव्हा, खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निम्न दरापेक्षा अधिक नसेल इतक्या दराने, आणि असा दर उपलब्ध नसेल त्याबाबतीत तडजोडीद्वारे निश्चित करण्यात येईल अशा दराने पैसे देण्यात येतील.

तथापि, त्याबाबतची अट अशी आहे की, प्राधिकाऱ्याच्या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा निर्णय आणि मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या प्रकरणी, संचालकाचा निर्णय अंतिम राहील.

२९. **आग विझविण्याच्या प्रयोजनासाठी कर्मचारी वर्गास किंवा साधनसामग्रीला किंवा दोन्हींना सुरक्षित करण्याबद्दलच्या शर्ती.**— ज्या शर्ती संचालकास किंवा मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अग्निशमन अधिकाऱ्यास, कामावर लावण्यात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या अग्निशमन साधनसामग्रीला किंवा कर्मचारी वर्गाला कराराद्वारे सुरक्षित करता येईल आणि आग विझविण्याच्या प्रयोजनार्थ, त्या कर्मचारी वर्गाचे किंवा उपकरणाचे किंवा दोन्हींचे परिरक्षण करता येईल, त्या शर्ती पुढीलप्रमाणे असतील :—

(१) अग्निशमनाचे कार्य पूर्ण झाल्यानंतर लगेच यथास्थिती संचालक किंवा मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन कार्याचा प्रभारी अग्निशमन अधिकारी अशा सुरक्षित केलेल्या कर्मचारी

वर्गाची किंवा साधनसामग्रीची मुक्तता करतील आणि जिच्याकडून असा कर्मचारी वर्ग किंवा साधनसामग्री घेतली होती अशा व्यक्तींकडे (स्थानिक प्राधिकरण, व्यवसायसंस्था आणि संस्था किंवा व्यक्ती यासह) त्यांना सुपुर्द करील.

(२) यात यापुढे नमूद केलेल्या तत्त्वानुसार निश्चित केलेली भरपाई रक्कम अशा कर्मचारी वर्गाच्या नियोक्त्याला किंवा अशा साधनसामग्री मालकाला देण्यात येईल, म्हणजे,—

(क) भरपाईची रक्कम करारानुसार निश्चित करण्यात आली असेल त्याबाबतीत ती अशा करारानुसार देण्यात येईल.

(ख) अशी भरपाई रक्कम करारात नक्की करण्यात आली नसेल किंवा भरपाईच्या बाबतीत अशा कराराचा कोणताही संबंध पोहोचत नसेल तर, ती बाब राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

(ग) कोणत्याही कर्मचाऱ्याला कोणतीही क्षती पोहोचली असेल किंवा कोणत्याही साधनसामग्रीला कोणतीही हानी पोहोचली असेल आणि यथास्थिती अशा कर्मचाऱ्याचा नियोक्ता किंवा साधनसामग्रीचा मालक, त्याबाबतच्या कोणत्याही भरपाईची मागणी स्वतंत्ररित्या करील, आणि तिचा कराराशी कोणताही संबंध पोहोचत नसेल तर, ती बाब, निश्चित करण्यासाठी राज्य शासनाचा त्यावरील निर्णय अंतिम असेल.

३०. **कलम ३२ खालील अपील.**— (१) कोणत्याही व्यथित झालेल्या व्यक्तीस, कलम ३२ च्या पोट-कलम (१) चे खंड (क), (ख) किंवा (ग) यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, नोटीस किंवा आदेश किंवा, यथास्थिती, नकाराबाबतची संसूचना मिळाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, "नमुना यू" मध्ये अपील दाखल करता येईल.

(२) अशा अपील अर्जावर रु. १० चा न्यायालय फी मुद्रांक लावलेला असेल आणि तसेच, त्यासोबत प्राधिकरणाच्या कार्यालयात भरावयाची रु. ५०० इतकी फी असेल, आणि त्याबाबतची पावती अपील नमुन्यासोबत जोडलेली असेल.

(३) असे अपील व्यक्तिशः सादर करण्यात येईल किंवा ते, नोंदणीकृत डाकेने किंवा कुरीअर एजन्सीद्वारे पाठविण्यात येईल.

(४) असे अपील मिळाल्यावर, पदनिर्देशित अधिकारी, जेथवर व्यवहार्य तेथवर, असे अपील मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपिलकारास आणि प्राधिकरणास सुनावणीची नोटीस काढील आणि सुनावणीच्या दिनांकानंतर ३० दिवसांच्या आत ते अपील अंतिमतः निकालात काढील.

नमुना-अ *

[ कलम ३(३) व नियम ४(१) पहा ]

## आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांची कामे पार पाडण्यासंबंधात लायसन्सप्राप्त अभिकरणाने दिलेले प्रमाणपत्र

### प्रमाणपत्र

मी / आम्ही असे प्रमाणित करीत आहे / आहोत की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ (२००७ चा महा. तीन) याच्या तरतुदींखाली आवश्यक केल्याप्रमाणे ...ील इमारतीमध्ये किंवा जागांमध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना करण्यासंबंधात व ...य तदानुषांगिक बाबींचे अनुपालन करण्याच्या दृष्टीने कामे पार पाडली आहेत.

**स्थळ, इमारत, परिसराचा तपशील**

..............................................................................................................

..............................................................................................................

... / आम्ही पार पाडलेली किंवा केलेली कामे किंवा संबंधित कृती यांचा तपशील यासोबत जोडलेल्या ...ीमध्ये नमूद केला आहे.

...ठिकाण : लायसन्सप्राप्त अभिकरणाचा

...दिनांक :

सही

व पत्ता

लायसन्स क्रमांक :

[ * **टीप.**— प्रत्येक इमारतीसाठी फॉर्म-अ मध्ये स्वतंत्र प्रमाणपत्र देणे **आवश्यक** आहे. ]

नमुना - ब

[ कलम ३ (३) व नियम ४ (२) पहा ]

**आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांची कामे पार पाडण्यासाठी मालकाने किंवा भोगवटादाराने प्रत्येक जानेवारी व जुलै या महिन्यांमध्ये द्यावयाचे सहामाही प्रमाणपत्र**

**प्रमाणपत्र**

मी / आम्ही असे प्रमाणित करीत आहे / आहोत की, पुढील इमारतीमध्ये किंवा जागेमध्ये बसविण्यात आलेल्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या साधनांची तपासणी करण्याचे काम पार पाडले आहे.*

............................................................................................................

............................................................................................................

मी / आम्ही आणखी असे प्रमाणित करतो की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ (२००७ चा महा. तीन) यांच्या तरतुदींखाली आवश्यक केल्याप्रमाणे .................. या कालावधी दरम्यान वर नमूद केलेल्या इमारतीमधील बसविण्यात आलेली साधने सुस्थितीत व कार्यक्षम स्थितीत ठेवण्यात आली आहे. यासोबत जोडलेल्या अहवालामध्ये, मी / आम्ही या साधनाची तपासणी करण्याचा केलेल्या कामाचा तपशील नमूद केला आहे.

ठिकाण :

दिनांक :

लायसन्सप्राप्त अभिकरणाचा,

सही

व पत्ता.

लायसन्स क्रमांक :

[ * **टीप.**— येथे तपशिलवार स्थळ व पत्र व्यवहाराचा पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. ]

नमुना - क

[ कलम ४ (२) व नियम ५ (१) पहा ]

**आग लागण्याचा धोका असल्याचा संभव असलेल्या वस्तू किंवा माल हलविण्यासाठी नोटीस**

प्रति,

श्री. / मेसर्स ..............................................................

..............................................................

..............................................................

ज्याअर्थी, शासनाने **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग ४-ब दिनांक ६ डिसेंबर २००८ यात प्रसिद्ध झालेल्या नगर विकास विभाग, अधिसूचना क्रमांक अशस. १४०८/१४९१/प्र.क्र. २२१/०८/नवि-२०, दिनांक ६ डिसेंबर २००८ च्या अधिसूचनेद्वारे राज्य शासनास, त्यांच्या मते, ज्यांना आग लागण्याचा धोका आहे. अशा खालील क्षेत्रामधील वापरत्या जागेच्या किंवा कोणत्याही वर्गाच्या मालकास किंवा भोगवटादारास उक्त अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केली असेल अशी सावधगिरी घेण्यास भाग पाडले आहे व यांखाली त्यातील भाग उद्धृत केला आहे :—

..............................................................

..............................................................

आणि ज्याअर्थी, तुम्ही उक्त शासकीय अधिसूचनेत नमूद केलेल्या क्षेत्रामध्ये येणाऱ्या पुढील जागांचा मालक / भोगवटादार आहात.

..............................................................

